नि.दि.दा.क्र३९१/२०१६
गजानन -वि-लक्ष्मण
**CNRNO.-MHBI800-0828-2016**

## नि.क्र. २१ वरील आदेश

(दि. १८ मार्च, २०२३ रोजी पारीत)

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. ३ चे वारस अभिलेखावर घेण्या साठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ३ हे दि.२१.१२.२०१६ रोजी मयत झाले आहेत. त्यांचे पश्चात वारस क्र. १ ते ३ हे वारस आहेत, असे कथन करून अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

३. प्रतिवादीतर्फे सदर अर्जावरच आक्षेप नोंदविला आहे. प्रतिवादीचे असे कथन आहे की, अर्जातील कारणे संयुक्तिक नाहीत असे कथन करून अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली. प्रस्तावित वारसदारांना नोटीस बजावणी होवुनही ते हजर झाले नाहीत.

४. वादी व प्रतिवादीतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांचे अर्ज व म्हणण्याप्रमाणे युक्तिवाद केला. नि.क्र. २० वर प्रतिवादी क्र. ३ यांचेविरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यासाठी झालेला विलंब माफ करून अबेटमेंट रद्द करण्यात आली आहे. वारसांना अभिलेखावर समाविष्ट करून घेतल्यास सदर दाव्याचा गुणानुगुणावर निपटारा होण्यास मदतच होणार आहे. तथापि वारस अभिलेखावर समाविष्ट करून न घेतल्यास वादीचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. अर्जास योग्य कारण आहे. सबब, न्यायाचे उद्ष्ठि साध्य करण्याकरीता वरील कारणांचा विचार करुन खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. ३ चे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी देण्यात येते.

३. वादींनी पुढील तारखेपर्यंत वारस अभिलेखावर घ्यावेत.

Digitally signed by ravindra anandrao sawant
Date: 2023.03.18 17:38:18 +0530

(आर.ए. सावंत)
सह दिवाणी न्यायाधिश(क.स्तर)
माजलगाव.

दि.१८.०३.२०२३

नि.दि.दा.क्र३९१/२०१६
गजानन -वि-लक्ष्मण
**CNRNO.-MHBI800-0828-2016**

**नि.क्र. ३० वरील आदेश**

(दि. १८ मार्च, २०२३ रोजी पारीत)

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. १ चे वारस अभिलेखावर घेण्या साठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ हे दि.१८.०८.२०२० रोजी मयत झाले आहेत. त्यांचे पश्चात वारस क्र. १ ते ४ हे वारस आहेत, असे कथन करून अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

३. प्रतिवादीतर्फे सदर अर्जावरच आक्षेप नोंदविला आहे. प्रतिवादीचे असे कथन आहे की, अर्जातील कारणे संयुक्तिक नाहीत असे कथन करून अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली. प्रस्तावित वारसांनी त्यांचे म्हणणे दिले नाही.

४. वादी व प्रतिवादीतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांचे अर्ज व म्हणण्याप्रमाणे युक्तिवाद केला. नि.क्र. २८ वर आदेश करून वारस अभिलेखावर घेण्या साठी झालेला विलंब माफ करण्यात आला आहे तसेच नि.क्र. २९ वर आदेश करून अबेटमेंट रद्द करण्यात आली आहे. वारसांना अभिलेखावर समाविष्ट करून घेतल्यास सदर दाव्याचा गुणानुगुणावर निपटारा होण्यास मदतच होणार आहे. तथापि वारस अभिलेखावर समाविष्ट करून न घेतल्यास वादीचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. अर्जास योग्य कारण आहे. सबब, न्यायाचे उद्दिष्ठ साध्य करण्याकरीता वरील कारणांचा विचार करुन खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १ चे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी देण्यात येते.

३. वादींनी पुढील तारखेपर्यंत वारस अभिलेखावर घ्यावेत.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by ravindra anandrao sawant
Date: 2023.03.18 17:38:25 +0530

(आर.ए. सावंत)
सह दिवाणी न्यायाधिश(क.स्तर)
माजलगाव.

दि.१८.०३.२०२३